जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०३/२०२४
## दि.०९/०३/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गु.नं./कलम** | मुंढवा पो.स्टे.१०४/२०२४,भादविक २७९,३०४(अ) |
| **फिर्यादी** | सचिन लक्ष्मण मेमाणे,पोलीस अमंलदार मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर. |
| **आरोपीत** | बबलू हरीप्रसाद वर्मा वय ३८ वर्षे,रा.आगवाली चाळ,घोरपडीगांव,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०२/२०२४ रोजी १८/३०वा.चे सुमारास,अनंत टॉकीज समोर,घोरपडीगांव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील मयत इसम बबलू हरीप्रसाद वर्मा वय ३८ वर्षे,रा.आगवाली चाळ,घोरपडीगांव,पुणे हा त्यांचे वडीलांना देसाई हॉस्पीटल,मोहम्मदवाडी,पुणे येथे जेवणाचा डबा देऊन परत घरी येत असताना रात्री ०८/३० वा. चे सुमारास अनंत टॉकीज समोर,घोरपडीगांव,मुंढवा पुणे येथे त्यांचे मोटार सायकल वरून स्लीप होऊन पडल्याने त्यांचे हाताला,तोंडाला व डोक्याला मार लागला होता.किरकोळ दुखापत झाल्यामुळे त्यांनी दवाखान्यात उपचार घेतले नाहीत.दिनांक २९/०२/२०२४ रोजी त्यांची डावी बाजू थंड पडू लागल्याने त्याचे नातेवाईकांनी त्यास उपचारकामी रांका हॉस्पीटल व नंतर ससून हॉस्पीटल येथे ॲडमिट केले असता तेथे त्याचे डोक्याचे ऑपरेशन झाल्यावर त्यास आय.सी.यू.मध्ये ॲडमिट केले असता दिनांक ०८/०३/२०२४ रोजी पहाटे ०४/३० वा.त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असून त्याने हयगयीने वाहतुकीच्या नियमनाचे पालन न करता बेदरकारपणे त्याचे ताब्यातील वाहन चालवून स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज.छत्तीसे मो.नं.९४०४२२९८२२ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो.स्टे.१०९/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्षे रा.लोहगाव पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल, लिंक धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक व वापरकर्ते असलेले ॲडमिन तसेच लिंक धारक वापरकर्ता यांनी फिर्यादी यांचेशी संपर्क करून शेअर मार्केटमध्ये प्रॉफिट कमवुन देणाऱ्या शेअरसची माहिती देतो त्याद्वारे मोठ्या प्रमाणात प्रॉफिट मिळेल तसेच शेअर ट्रेडींगचे IPO HDFC ॲप डाऊन लोड करण्यास सांगुन त्यांचे नमुद ॲपचे खातेदार होण्याकरीता सांगितले त्याकरीता शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करण्यासाठी व फिर्यादी यांना शेअरचा आय.पी.ओ.मिळेल त्यामधुन फिर्यादी यांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल असे सांगुन तसेच शेअर्स मध्ये फिर्यादी यांना झालेल्या प्रॉफिट मध्ये टॅक्सची रक्कम ट्रान्सफर करावी लागेल असे सांगुन बँक खात्यामध्ये पैसे ट्रान्सफर करण्यास सांगुन फिर्यादी यांची रुपये १०,४७,७००/-रु.ची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे)सर्जेराव कुंभार मो.नं.९९२३०७५४३४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**